# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/12/2023 (शुक्रवार) सकाळ


---

### अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
### पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत विशेष पोलीस पथकाची कामगिरी

मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण ह्यांचे आदेशाने, विशेष पोलीस पथकांनी पोलीस ठाणे मौदा परीसरात अवैध रित्या विनापरवाना १४ चक्का एलपी ट्रक गाडी क्र. एम. एच. ४८/ए.जी. २४१६ भंडाराकडुन मौदा मार्ग नागपुरकडे रेती (वाळु) एलपी ट्रकमध्ये लोड करून वाहतुक करीत असतांना मिळुन आला. सदर वाहनावर मिळून आलेला ईसम १) कलीम खान नसीर खान वय ४९ वर्ष, रा. पठान चौक नागपुरी गेट पोलीस ठाणे जवळ (एम. एच. ४८/ए.जी. २४१६ चा चालक) २) शेख अलीम शेख कलीम वय ३६ वर्ष, रा. पठान चौक नागपुरी गेट पोलीस ठाणे जवळ, (एम. एच. ४८/ए.जी. २४१६ चा क्लीनर) असे सांगीतले. त्यांचे ताब्यातील एलपी ट्रक वाहनाचा नंबर एम. एच. ४८/ए.जी. २४१६ असा असुन, सदर वाहनाची पाहणी केली असता, १) एलपी ट्रक किंमती २५,००,०००/—रूपये, २) अंदाजे १२ ब्रास रेती, प्रत्येकी ब्रास ५०००/— रूपये प्रमाणे एकूण ६०,०००/—रूपये, ३) दोन आरोपीतांचे प्रत्येकी ०१, असे एकुण ०२ वेगवेगळया कंपनीचे जुने वापरते ॲन्ड्राईड मोबाईल एकुण किंमती २०,०००/— रूपये ४) नगदी एकुण २०३०/—रूपये असा एकुण २५८२०३०/—रूपयेचा मुद्देमाल मिळुन आलेला आहे.

वर नमुद वर्णनाचा मुद्देमाल मिळुन आलेल्या ईसमांना मुद्येमालाविषयी विचारणा केली असता, वर नमुद वाहन एक पिवळया व हिरव्या रंगाचे टाटा कंपनीचे १४ चक्का एलपी ट्रक, ज्याचा नंबर एम. एच. ४८/ए.जी. २४१६ चा मालक नामे आकाश भोंगाडे रा. कामठी हे असुन एम. एच. ४८/ए.जी. २४१६ या वाहनाचा ताबा सोहेब खान वय ४० वर्ष, रा. जमील कॉलनी अमरावती यांचा आहे. वाहन ताबा मालक यांचे सांगणेप्रमाणे सदर रेती (वाळु) बफेरा (गोंदीया) येथुन अवैधरित्या स्वत:चे आर्थीक फायद्याकरीता लोड करून भंडाराकडुन मौदा मार्ग अमरावती येथे विना रॉयल्टी घेवुन जात असल्याचे सांगीतले.

पोलीस ठाणे मौदा येथे दि. २९/१२/२०२३ रोजी अप.क्र. १२४४/२०२३ कलम ३७९, १०९, ३४ भारतीय दंडविधान संहीता—१८६०, सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम —१९६६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन, सदर गुन्ह्यात ०१ वाहन, १२ ब्रास रेती, ०२ मोबाईल आणि नगदी पैसे असा एकुण २५,८२,०३०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री संदीप पखाले यांचे मार्गदशनाप्रमाणे सपोनि अमीत पांडेय विशेष पोलीस पथक ना.ग्रा. यांनी त्यांचे पथक पोहवा ललीत उईके, पोना प्रणय बनाफर, पोअं. कार्तीक पुरी, बालाजी बारगुले, शुभम मोरोकर यांचेसह केली असुन, वेळीच घटनास्थळ पंचनामा व मुद्देमालासह २ आरोपीस अटक करण्यात आली असुन, ईतर २ पाहीजे आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. पुढील तपास पोलीस ठाणे मौदा अंतर्गत करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर